# खबरबात
## जुलै ते सप्टें. २०२३

उन्नती संस्था
सामाजिक आणि शैक्षणिक बदलासाठी

### केंद्र स्तरीय शिक्षक सभेत उन्नतीचा सहभाग

आम्ही काम करीत असलेल्या केंद्रातील ८ ते १० शाळांमधील सर्व शिक्षकांची एकत्रित सभा (शिक्षण परिषद) २ किवा ३ महिन्याने एकदा शिक्षण विभागातर्फे घेतली जाते. आम्ही या दोन्ही ही सभांमध्ये सहभागी झालो. पुढे जाऊन या सभांमध्ये आम्हाला उन्नतीच्या विषयांची मांडणी करायची आहे, हे लक्षात घेता या सभांचे संचालन, वेळापत्रक, चर्चिले जाणारे विषय याबद्दल आम्ही माहिती करून घेतली. Performance Grade Index, पायाभूत चाचणी, नवभारत साक्षरता कार्यक्रम, अध्ययन निष्पत्तीनुसार प्रश्नपत्रिका तयार करणे, मुलांचे अध्ययन स्तर निश्चिती, उपक्रम इत्यादी शाळेत राबविणाऱ्या कार्यक्रमांची माहिती आम्हाला मिळाली.

### आश्रम शाळांमध्ये वर्ग सुरु झाले

आदिवासी विकास विभागाच्या परवानगी नंतर ३ जुलै पासून उन्नती संस्थेने ४ आश्रमशाळांमध्ये ५ वी, ६ वी, ७ वी आणि ८ वीच्या मुली आणि मुलांबरोबर काम सुरू केले. साक्षरता वर्ग, वाचनालय उपक्रम, युथ गट बांधणी हे उपक्रम वेगवेगळ्या इयत्तांमध्ये नियमितपणे सुरु झाले. ठाणे जिल्ह्यात आश्रमशाळांमध्ये मुलांसाठी अशा प्रकारे वाचनालय हा विषय घेऊन काम करणारी उन्नती ही पहिलीच संस्था आहे.



### भोंगा वाचनालय- नवा उपक्रम



उन्नतीच्या वतीने चालविल्या जाणाऱ्या गाव वाचनालयात प्रथमच ऑगस्ट २०२३ पासून भोंगा वाचनालय उपक्रम 'कोहा आणि खिरकुंड(खु.)' या दोन गावात सुरु करण्यात आला आहे. यामध्ये मराठी व कोरकू भाषेतील गोष्टी गावातील मुख्य चौकात भोंग्यावरून ऐकविल्या जातात. गावातील लोक घरी बसून काम करत-करत गोष्टी ऐकतात. गावातील निरक्षर, अंध, घरकामात व्यग्र असणाऱ्या महिला, पुरुष, मुले यांना गोष्टी ऐकण्याची संधी मिळते.
उपक्रम अनोखा असल्यामुळे पहिल्याच दिवशी नागरिक आपापल्या दारात बसून गोष्ट ऐकताना दिसले. कोहा येथील रहिवाशी भाजीलाल कास्देकर यांचा देवघेव प्रक्रियेत पूर्वी सहभाग नव्हता; परंतु जेव्हापासून भोंगा वाचनालय त्यांच्या घरासमोर सुरु झाले, तेव्हापासून ते पुस्तक देवघेव करू लागले.

### आपापल्या गावात मुलांनी केले कुटुंब सर्वेक्षण






आश्रमशाळांतील काही निवडक किशोरवयीन मुली व मुलांच्या गटासोबत नेतृत्व कौशल्य विकासावर संस्था या वर्षीपासून काम करीत आहे. युथ गटातील या मुला-मुलींसोबत प्रत्यक्ष कामाची संधी देत त्यांचा कौशल्य विकास करण्यावर भर देण्यात येतोय. यासाठी या मुलांना दिवाळीमध्ये आपापल्या गावी घरी गेल्यावर गाव वाचनालय चालवण्याचा उपक्रम देण्यात येणार आहे. यासाठी आवश्यक त्या कौशल्यांचा विकास व ज्ञानबांधणीसाठी त्यांच्यासोबत सत्रे घेण्यात आली आहेत. सप्टेंबरमध्ये ही मुले जेव्हा गणपतीच्या सुट्टीत गावी गेली होती तेव्हा त्यांना गाव वाचनालयची तयारी करून घेण्याच्या हेतूने आपापल्या गावात मोजक्या कुटुंबांसोबत सर्वेक्षण करण्याचे कौशल्य देण्यात आले. प्रश्नपत्रिका कशी तयार करायची याचे प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये मुलांकडूनच प्रश्न काढून घेण्यात आले. या युथ गटातील निवडक सदस्यांनी त्यांच्या गावातून प्रत्येकी १० ते १५ कुटुंब सर्वेक्षणाच्या पत्रिका गणपतीच्या सुट्टीदरम्यान भरून घेतल्या. या दरम्यान उन्नती येथील कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष त्यांच्या गावात जाऊन त्यांना भेटी दिल्या व अडलेल्या गोष्टींवर मार्गदर्शन केले. प्रत्यक्ष सुट्टीनंतर याबाबत गटनिहाय चर्चा घेण्यात आली असता, मुलांनी या प्रकल्पात संवाद कौशल्य विकसित करता आल्याचे सांगितले. तसेच आपला उद्देश समजवून सांगण्याचा धीटपणा आला, तसेच हे काम करताना आत्मविश्वास निर्माण झाल्याचेही व्यक्त केले. शेणवे आणि बाबरे येथील आश्रमशाळांसोबत यूथगटाचे काम सुरु आहे.

## साक्षरता पूर्व क्षमता चाचणी , अकोट

नवीन शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यावर अध्ययन-अध्यापनाचे नियोजन करावे लागते. त्यासाठी २ ते ३ महिन्यांच्या सुट्टीच्या अवकाशानंतर मुलांची साक्षरतेची स्थिती समजून घेण्यासाठी उन्नतीचे वर्ग असलेल्या एकूण ५ गावांमध्ये इयत्ता २ री व ३ री च्या मुलांची 'साक्षरता-पूर्व चाचणी' घेण्यात आली. या चाचणीवरून आलेल्या निकालानुसार मुलांचे गट पाडून शिकविण्याचे पुढील नियोजन केले. या चाचणीच्या आधारे मुलांचे मुळाक्षर, चौदाखडी, जोडाक्षर व वाचन गट असे चार गटांमध्ये वर्गीकरण करण्यात आले.

## साक्षरता पूर्व क्षमता चाचणी , शहापूर

या वर्षी संस्थे अंतर्गत इयत्ता ५ वी व ६ वी च्या मुलाबरोबर वाचनालय वर्ग घेण्याचे ठरविण्यात आले या मुलांची वाचनाची क्षमता समजण्यासाठी जुलैमधील तिसऱ्या आणि चौथ्या आठवड्यापासून शेणवे, कोठारे, बाबरे व टाकीपठार या शाळेतील मुलांची बेसलाईन चाचणी घेण्यात आली. या चाचणीच्या आधारे मुलांचे मुळाक्षर गट, चौदाखडी, जोडाक्षर गट व वाचनगट असे चार गटामध्ये वर्गीकरण करण्यात आले. त्यानुसार अप्रगत मुलांचा वेगळा गट बनवून प्रत्येक शाळेतील २४ ते ३५ मुलांबरोब वेगळा साक्षरता वर्ग सुरू करण्यात आला. आकलनासहीत वाचन करता येण्याचे उद्दिष्ट्य निश्चित करण्यात आले.

## महिला आणि मुलींसोबत विशेष उपक्रमाला सुरुवात...



कोरकू समाज हा प्रामुख्याने पितृसत्ताक आहे. महिलांचे स्थान दुय्यम आहे. त्याचा परिणाम म्हणून या गावांतील महिला-मुली मागास आहेत. त्यांच्या मनात आकांक्षा खूप असतात, पण त्यासाठी काही करावे तर परंपरेने बंधने घातली आहेत. हे लक्षात आल्यावर आम्ही दोन वर्षांपासून मुलींसोबत काम करायला सुरुवात केली. काय करावे याची आधी काहीच स्पष्टता नव्हती, पण काही उपक्रम करीत राहिलो, त्यातून मुलींचे विश्व समजून घेत राहिलो. या वर्षी जेव्हा गाव वाचनालय हा उपक्रम आणखी काही गावांत राबविण्याचा निर्णय घेतला, तेव्हा किमान दोन गावांतील मुलींसोबत विशिष्ट हेतू ठेवून काम करायचा निर्णयही घेतला. जनुना व खिरकुंड बु. या दोन आदिवासी गावांमध्ये जुलै २०२३ पासून गाव वाचानालयाचाच एक भाग म्हणून गावातील १५ ते २५ या वयोगटातील महिला-मुलींचे गट स्थापन करण्यात आले. मुलींचे कौशल्य विकासन व त्याद्वारे त्यांची आत्मविश्वास बांधणी हे जरा व्यापक उद्दिष्ट ठेवून या गटांसोबत आठवड्यातून एकदा बैठका घेण्यास सुरुवात केली. साधारण १५ ते १८ मुली महिला या गटात येतात.

हे गट स्थापन करण्याचा मुख्य उद्देश आदिवासी भागातील महिलांचे नेतृत्व विकसित करणे हा आहे. या गटातील महिलांचा सहभाग गाव वाचनालयामध्ये पुस्तक देवघेव करणे तसेच आदिवासी संस्कृती, निसर्ग, खानपान इत्यादी विषयांवर कथा लेखन करणे हे सुद्धा या गटाकडून अपेक्षित आहे. अजूनही हा गट स्थिर झाला असे म्हणता येणार नाही; कारण प्रत्येक सभेत गटातील सर्व सदस्य उपस्थित नसतात, महिला बदलत असतात व गावातील इतर महिलासुद्धा या सभेत सहभागी होतात. कागदी पिशवी, तोरण बनविणे, बचत गटाविषयी व गटातील कामकाजविषयी माहिती देणे, गोष्टी सांगणे, पुस्तके वाचायला देणे, चित्रकला असे उपक्रम सुरु केले. सुरुवातीला न बोलणाऱ्या महिला आता बोलू लागल्या आहेत. आपले मन, जगणे, भावना व्यक्त करू लागल्या आहेत. चित्रकाम, हस्तकाम हे त्यांना विशेष आवडते असे आमच्या लक्षात आले. यामधून शिकत आता या गटांसोबतच्या कामाची पुढील दिशा ठरवण्याचे काम आम्हाला आता करायचे आहे.

## आश्रम शाळांतील मुलांचे भाषिक सर्वेक्षण

उन्नती संस्था केवळ आदिवासी क्षेत्रात काम करते आणि आदिवासी समाजांच्या भाषा मराठीपेक्षा वेगळ्या असतात. संस्था बहुभाषिक शिक्षणाचा दृष्टीकोन घेऊन काम करीत असल्याने भाषिक सर्वेक्षण हा संस्थेचा पायाभूत उपक्रम असतो. या वर्षी नियमित वर्ग सुरु झाल्यानंतर सर्व शाळेतील इयत्ता ५ वी व ६वी च्या मुलांचा भाषिक सर्वेक्षण करण्यात आले. हे सर्वेक्षण शेणवे, बाबरे, टाकी पठार आणि कोठारे येथील चार आश्रम शाळांतील इयत्ता ५ वी आणि ६ वीच्या विद्यार्थ्यांबरोबर करण्यात आले. या सर्वेक्षणाच्या आधारे समोर आलेले काही निष्कर्ष पुढीलप्रमाणे-

- एकूण १९२ मुली आणि ११९ मुले यांच्याबरोबर हे सर्वेक्षण करण्यात आले.
- संबधित मुले ही साधारणपणे १२ वर्षांची होती.
- चारही शाळांमध्ये सर्वाधिक म्हणजे ७२ टक्के मुली-मुले ही म. ठाकूर जाती जमातीमधील आहेत, तर २२ टक्के कातकरी समाजातील आहेत.
- गावामध्ये अन्य समाजाचे लोकही असल्याने ९९ टक्के मुलांना मराठी ही भाषा समजते; परंतु यातील सर्व घरामध्ये जातीनिहाय म. कोळी, म. ठाकूर, कातकरी आणि वारली याच भाषा बोलल्या जातात.
- या भाषिक वास्तवाची दखल घेऊन उपक्रमांच्या धोरणाची दिशा ठरवण्यात येईल.




## कार्यक्रमपूर्व चाचणी झाली

सप्टेंबर २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात शहापूर येथील आश्रम शाळेमध्ये प्री-टेस्ट फॉर्म भरून घेतले. मानसिक आरोग्य आणि मुलांची एकूण प्रगती याचा अंदाज यावा म्हणून या टेस्ट घेण्यात आल्या आहेत. यामध्ये शेणवे, बाबरे टाकी पठार आणि कोठारे येथील ५, ६वी आणि ७ वी इयत्तेच्या २७६ अधिक ३४० विद्यार्थी आणि विद्यार्थिनींचा समावेश करण्यात आला. सध्या यावरील अहवालाचे काम सुरू आहे. वाचनालय कार्यक्रमाची जेव्हा मार्च / एप्रिल मध्ये वर्षअखेर होईल तेव्हा पोस्ट टेस्ट घेण्यात येईल.

## मुलगा मुलगी भेद गळून पडला



शिकू आनंदेचे म्हणजे साक्षरतेचे वर्ग घेत असताना एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात आली होती की वर्गात मुलगे व मुली एकत्र बसत नाहीत. यावर आम्हाला मुलांसोबत बरेच काम करावे लागले, त्याची ही गोष्ट.

खिरकुंड बुद्रुक गावात गेल्या दीड वर्षापासून शिकू आनंदे वर्ग सुरू आहे. वर्गात मुलगा-मुलगी जवळ न बसणे, एकमेकांशी न बोलणे, एकमेकांचा जरा सुद्धा धक्का सहन न करणे अशा अनेक गोष्टी समोर येत होत्या. यावर गेले वर्षभर मुलांशी संवाद करूनही काही फरक पडला नव्हता.

या वर्षी मात्र वर्ग सुरु झाल्यावर यावर बदल घडवून आणायचाच असा निश्चय केला. यासाठी एक कृती घेण्यात आली. मुलांच्या नावांचे बिल्ले उलटे करून ते जमिनीवर मोठ्या गोलात ठेवले. मुलांना सांगितले की' तुम्ही प्रत्येकाने एकेका बिल्ल्यासमोर उभे रहा. सुलभकाने सूचना दिल्यावर एकेकाने क्रमाने आपल्या समोर असलेले उलटे बिल्ले उचलून त्यावर कोणाचे नाव आहे हे बघितले आणि त्या जागेवर त्या मुलाला/ मुलीला बोलवून तिथे बसवले. अशा पद्धतीने सर्वच मुलांची एक निश्चित जागा तयार झाली. शेवटी सुलभकाने सूचना दिली की, आता ही तुमची जागा आहे. नियमित तुम्ही या जागेवर बसायचे आहे. असे सांगितले तरी मुले ऐकणार होती थोडीच? मुले दुसऱ्याच दिवसापासून स्वतःच्या जागेवर बसण्याचा हट्ट धरायला लागली. मात्र सुलभकाला इथे कठोरता स्वीकारावी लागली, अनेक दिवस ठाम राहावे लागले. रोज मुले वर्गात आल्यावर त्यांच्याशी सुलभकाने संवाद करायला सुरुवात केली. सतत एक महिना ठामपणा व संवाद यामध्ये सातत्य ठेवल्यावर यशदिसू लागले. आता मुले व मुली एकत्र बसून गटकार्य करतात. हळूहळू मुलांमध्ये एकमेकांविषयीचा भेद गळून पडला आहे.

# उन्नतीचा गाव कनेक्ट

२० ते २४ सप्टें. २०२३ या कालावधीत उन्नती काम करत असलेल्या ५ पैकी ४ आदिवासी गावांमध्ये उन्नतीच्या अकोला संघातर्फे गणपती समोर गावसभा घेण्यात आली. यामध्ये उन्नतीच्या कार्यकर्त्यांनी पथनाट्य सादर केले. मुलांची सुरक्षा, पालकांच्या स्थलांतरणामुळे मुलांचे होणारे शैक्षणिक नुकसान व उन्नती काम करत असलेल्या विषयांची मांडणी पथनाट्यातून झाली. या सभेत गावातील लहान मुले, महिला, पुरुष सहभागी होते. पथनाट्य आवडले आणि असे कार्यक्रम गावात पुन्हा घेण्यात यावे अशा प्रतिक्रिया गावकऱ्यांनी दिल्या.





## शिक्षकांसोबत नियोजन सादरीकरण सभा

शिक्षकांचा सहभाग घेण्याच्या दृष्टीने व उन्नती संस्थेच्या शिकू आनंदे वर्गामध्ये मातृभाषेतून मुलांना शिकविण्याची पद्धत शिक्षकांना माहिती व्हावी, विचारांची देवाण-घेवाण व्हावी या उद्देशाने माहे सप्टेंबरच्या तिसऱ्या आठवड्यापासून दर सोमवारी आंम्ही काम करीत असलेल्या ३ शाळांतील १ ली ते ५ वीच्या शिक्षकांसोबत वर्ग नियोजन शेयर करण्याच्या प्रक्रियेला सुरुवात केली आहे. . खिरकुंड बु, जनुना आणि डांगरखेड या शाळांमध्ये साधारणपणे १५ ते २० मिनिटे ही सभा चालते. ज्यात आठवड्याचे नियोजन, वर्गाविषयी, विशेष गोष्टी, शैक्षणिक साहित्य दाखविणे, आलेल्या अडचणी, मुलांविषयी तयार झालेली समज, यावर शिक्षकांचे मत या अशा गोष्टीवर चर्चा केली जाते. यातील एक किंवा दोन विषय घेवून संवाद प्रकिया चालते.

## कर्मचारी सक्षमीकरण

जुलै ते सप्टेंबर २०२३ या कालावधी दरम्यान एकूण १० प्रशिक्षणांमध्ये अकोला व शहापूर संघातील एकूण १५ संघ सदस्यांनी सहभाग घेतला. त्यातील ९ प्रशिक्षणे बाह्य संस्था/व्यक्तींमार्फत झाली.

I) Sociolinguistic Survey ii) MLE and Children's Literature' iii) organizational development iv) 'आनंददायी शिक्षा' कि ओर v) लायब्ररी एजूकेटर्स कोर्स vi) लायब्ररी से दोस्ती vii) Introduction to libraries viii) पुस्तकालय एक बढता आंदोलन ix) वाचनालय प्रशिक्षण

ही प्रशिक्षणे / कार्यशाळा MLE Collective, प्रवाह (दिल्ली), एकलव्य (भोपाळ), खेळघर पालकनीती (पुणे), पराग संस्था (भोपाळ), फ्री लायब्ररी नेटवर्क, वंदना कुळकर्णी (पुणे) अशा विविध संस्था / व्यक्तींनी आयोजित केली होती.

'लिंगभाव' या विषयावरील प्रशिक्षण संस्थेअंतर्गत व्यक्तीमार्फत २ दिवस प्रत्यक्ष स्वरुपात अकोला येथे घेण्यात आले.

## साक्षरता दिवस

उन्नती संस्था मातृभाषा आधारित साक्षरता व शिक्षण या विषयावर काम करते. त्यामुळे दरवर्षी साक्षरता दिवस संस्थेमार्फत वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. यावर्षी ९ ते १२ सप्टेंबर या कालावधीत कोहा, जनुना, खिरकुंड खु. आणि खिरकुंड बु. या एकूण ४ गावात हा दिवस साजरा करण्यात आला. यामध्ये गावातील वाचक, मुलांचे पालक यांनी जाहीर गोष्ट वाचन केले (चावडी वाचन). आजीच घर, पुस्तक न वाचणारी मुलगी, नारी से बने मजबूत समाज, यशाची कल्पकता, प्रकाशाचे ठिपके या पुस्तकांचे वाचन करण्यात आले.

'साक्षरता दिवस' असा ही दिवस असतो हे लोकांना या निमित्ताने समजले.

## माझ्या मध्ये बदल घडला...



मी शांता खोटे, सुरवातीला जेव्हा आमच्या गावात पुस्तक देवघेव सुरु झाले, तेव्हा मी सुद्धा वाचक म्हणून पुस्तक वाचनासाठी घेत होते. या वाचकाच्या भूमिकेत असतानाच मी ३१ डिसेंबर २०२२ मध्ये उन्नती संस्थेसोबत 'गावमित्र' म्हणून काम करू लागले. सुरवातीला मी खिरकुंड खु. मध्ये गावमित्र ही संकल्पना समजून घेण्यासाठी जात होते. तेथे ज्ञानेश्वरीताई त्या गावातील वाचकांसोबत पुस्तके देवघेव करत होती. ती वाचकांशी संवाद करत होती, वाचकांनी पुस्तक घ्यावे म्हणून वाचकांना प्रोत्साहित करत होती. हे बघून मला खूप छान वाटले. त्यानंतर मी ११/७/२०२३ ला स्वतः आमच्या गावात वाचकांसोबत पुस्तक देवघेव सुरु केले. माझ्यासमोर बऱ्याच अडचणी आल्या. मी वाचकांचे नाव लिहितांना सुरवातीला चुकत होते. आता माझ्या लिहिण्यात बदल झाले आहेत. मी चुका जास्त होऊ देत नाही. वाचक माझ्यासोबत सुरवातीपासूनच मन मोकळे करून घरातील व इतर विषयाबाबत माझ्याशी संवाद करु लागले. सुरवातीला मी गावातील लोकांना ओळखत नव्हते, पण आता त्यांचे नावासकट सर्व मला माहित आहे. वाचकांसोबत पुस्तक देवघेव करणे मला आवडते. गावाची सांख्यिकी माहिती मिळाली. पुस्तकातील संदर्भ हे वाचक मला अगदी मोकळेपणाने सांगतात. हे छान वाटते. आता आमच्या गावात पुस्तक देवघेव करताना मला माझ्यात खूप काही बदल झालेले दिसतात. पहिल्यासारखी भीती माझ्या मनात राहिली नाही, हा मोठा बदल माझ्यात झाला.

-- गाव कार्यकर्ती शांता खोटे

## आणि मुलांना अभ्यास आवडू लागला



बाबरे येथील मुले वाचनात रस घेताना

साक्षरता वर्ग बाबरे येथे इयत्ता ५ विच्या वर्गात घेण्यासाठी प्रस्ताव केला त्यावेळी मुलांच्या क्षमता घेण्यात आल्या त्यावरून मुलांना किती वाजता येत हे समजलं, या क्षमतेमुळे आमच्या निरीक्षणात आले की मुलांना अजून मुळाक्षरे पण येत नाही. या अप्रगत अशा ३० मुलाबरोबर साक्षरता घेण्याचे ठरले ही मुलं लहान गटातील इयत्ता ५ वी ६ विची होती, या वर्गातील मुलांचा पाया भक्कम करण्यासाठी आम्ही ५ विचा वर्ग निवडला.या वर्गातील मुलांना मुळाक्षरे येत नाहीत, काहींना येतात तर पूर्ण नाहीअशी परिस्थिती होती.या वर्गाला जुलैच्या शेवटच्या आठवड्यात सुरवात झाली सुरवात केली त्या मुलांना गटाप्रमाणे विभागणी केली. व त्यांचा अभ्यास घेत आहोत. साक्षरता वर्ग घेताना मुलांना खूप उत्साह असतो त्यांना हा सत्र आवडतो. ते स्वतः हुन सांगत असतात की मॅडम मला अभ्यास द्या, वाचन घ्या, गृहपाठ द्या ते कंटाळा करत नाहीत. या १५,२० दिवसात मुलांना मध्ये खूप फरक जाणवतो. ज्या मुलांना मुळाक्षरे येत नव्हती ती मुलं १२पेक्षा जास्त मुळाक्षरे ओळखतात, ऑ येत नव्हते ते ओळखायला लागले, साधे, कान्याचे व जोडाक्षरे वाचायला शिकली. थोडक्यात मुलांना पुस्तक, अक्षरांबरोब खेळणे आवडू लागले आहे आणि लवकरच हा प्रवास वाचनालयाकडे सुरू होणार आहे.



# मानवी शरीर सापळा निरीक्षण करताना मुले

**OUR BANKER:**
PUNJAB NATIONAL BANK, M. G. ROAD, THANE (WEST) MAH. 400602

**ACCOUNT NAME:**
UNNATI INSTITUTE FOR SOCIAL AND EDUCATIONAL CHANGE

**SAVINGS AC NO.:**
3739 0001 0064 2890

**IFSC :** PUNB0373900

**QR CODE FOR DONATIONS:**

**YOU MAY ALSO DONATE IN TWO INSTALMENTS IN A YEAR.**

उन्नती संस्था
सामाजिक आणि शैक्षणिक बदलासाठी


पत्ता- उन्नती संस्था, ४०२, निसर्ग कृपा,
सुयोग मंगल कार्यालयाजवळ, टिळक नगर,
डोंबिवली पूर्व, ४२१२०१

unnati.isec@gmail.com

9892103371

https://www.facebook.com/UNNATIFOREDUCATION?mibextid=ZbWKwL